# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.01.2026** **वार:सोमवार**

---

1. देशाच्या आर्थिक भवितव्यासाठी आत्मनिर्भरता आणि स्वदेशीचं मूल्य मार्गदर्शक ठरेल - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. सत्याहत्तराव्या प्रजासत्ताक दिनाचा देशभरात उत्साह; नवी दिल्लीत कर्तव्य पथावर होणार दिमाखदार संचलन
3. देशातल्या स्टार्टअप क्षेत्राचा, पंतप्रधानांनी, मन की बात मध्ये केला गौरवपूर्ण उल्लेख
4. दिवंगत अभिनेता धर्मेंद्र यांच्यासह 5 जणांना पद्मविभूषण; महाराष्ट्रातल्या 15 मान्यवरांचा पद्म पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आणि
5. न्यूझीलंड विरुद्ध वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारताची 3-0 अशी विजयी आघाडी

**राष्ट्रपती**

देशाचं आर्थिक भवितव्य घडवताना आत्मनिर्भरता आणि स्वदेशी ही मूल्यं मार्गदर्शक ठरतील, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. 77 व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला संबोधित करताना, त्या काल बोलत होत्या. जागतिक अनिश्चिततेच्या काळातही भारताची अर्थव्यवस्था सर्वात वेगानं वाढ नोंदवत आहे; जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचं ध्येय साध्य करण्याच्या दिशेनं देश वाटचाल करत आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या. जीएसटी प्रणालीमध्ये केलेल्या सुधारणा, नुकत्याच लागू केलेल्या कामगार संहिता, यामुळं देशाच्या विकासाला मोठी चालना मिळत असल्याचं त्यांनी नमूद केलं. देशाला अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भर करणारे शेतकरी, देशाच्या सर्वांगीण विकासात योगदान देणारी नारीशक्ती, तसंच जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवणारे देशातील तरुण उद्योजक, खेळाडू, आणि शास्त्रज्ञांची त्यांनी प्रशंसा केली. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेलं वंदे मातरम् म्हणजे आपल्या राष्ट्रवंदनेचा स्वर आहे, असं त्या म्हणाल्या. आपल्या भाषणात राष्ट्रपतींनी भारतीय संविधानाचं महत्त्व अधोरेखित केलं. आपल्या तिन्ही सैन्यदलांतील शूर सैनिक मातृभूमीच्या रक्षणासाठी सदैव दक्ष असतात, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून त्यांनी दहशतवादाला ठोस प्रत्युत्तर दिलं असं सांगून देशाला आणखी गौरवशाली बनवण्यासाठी; 'राष्ट्र प्रथम' या भावनेनं सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याचं आवाहन राष्ट्रपतींनी देशवासियांना केलं.

**मोदी-शुभेच्छा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. समाज माध्यमावरील पोस्टमध्ये, मोदी यांनी याप्रसंगी, देशातील नागरिकांमध्ये विकसित राष्ट्र निर्माण करण्यासाठी ऊर्जा आणि उत्साह निर्माण व्हावा, अशी भावना व्यक्त केली आहे.

**प्रजासत्ताक सोहळा**

सत्याहत्तराव्या प्रजासत्ताक दिनाचा आज देशभरात सर्वत्र उत्साह आहे. प्रजासत्ताक दिनाचा मुख्य संचलन सोहळा दिल्लीतल्या कर्तव्य पथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होत आहे. मुख्य सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र वाहतील. युरोपियन परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत. स्वातंत्र्याचा मंत्र- वंदे मातरम्

आणि समृद्धीचा मंत्र- आत्मनिर्भर भारत अशी यंदाच्या संचलन सोहळ्याची प्रमुख संकल्पना असून विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयं आणि विभागांचे तीस चित्ररथ प्रदर्शित केले जातील. गणेशोत्सव या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथही यात सहभागी होणार आहे.

**मन की बात**

मतदार हा लोकशाहीचा आत्मा आहे, त्यामुळं नवमतदारांनी मतदार नोंदणी करावी असं आवाहन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरुन मन की बात या कार्यक्रमात देशवासियांना केलं. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, मतदार दिवस साजरा केला जातो, त्यामुळं या दिवसाचं महत्त्व अधिक असल्याचं मोदी म्हणाले. प्रजासत्ताक दिनी संविधानकर्त्यांना नमन करण्याची संधी मिळणार असल्याची आठवणही त्यांनी करून दिली. देशात वेगानं वाढत असलेल्या स्टार्टअप क्षेत्राचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. पुढील महिन्यात कृत्रिम बुद्धिमत्तेशी निगडीत, इंडिया एआय इम्पॅक्ट परिषद होणार असल्याचं सांगून देशाची या क्षेत्रातील भारताची प्रगती आणि यश पंतप्रधानांनी अधोरेखित केलं.

**प्रजासत्ताक-पोलिस पुरस्कार**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, काल पोलीस, अग्निशमन दल, गृहरक्षक, नागरी संरक्षण आणि सुधारणा सेवांमधील एकंदर 982 कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील एकंदर 89 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. 31 पोलीस कर्मचाऱ्यांना शौर्य पदक, चार पोलीस अधिकाऱ्यांना आणि सुधारणा सेवा विभागातील दोन कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदक जाहीर झालं आहे. महाराष्ट्र पोलिस दलातील 40, अग्निशमन दलातील 4, नागरी संरक्षण आणि गृहरक्षक सेवेतील 3 तर सुधारणा सेवेतील 5 कर्मचाऱ्यांनाही उत्कृष्ट सेवा पदकानं गौरवण्यात येणार आहे. 2025 साठीच्या जीवन रक्षा पदक पुरस्कारांची घोषणाही काल करण्यात आली. महाराष्ट्रातल्या रूपाली कदम यांच्यासह देशातल्या 30 व्यक्तींना जीवन रक्षा पदकानं गौरवण्यात येणार आहे.

**पद्म पुरस्कार**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला काल पद्म पुरस्कारांची घोषणाही करण्यात आली. दिवंगत अभिनेता धर्मेंद्र, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती के. टी. थॉमस, व्हायोलिनवादक एन. राजम् यांच्यासह पाच जणांना पद्मविभूषण सन्मान जाहीर झाला आहे. एकंदर 13 जणांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगत सिंग कोश्यारी, गायिका अलका याज्ञिक, उद्योगपती उदय कोटक, जाहिरात क्षेत्रातले दिग्गज, दिवंगत पियूष पांडे, झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन, अभिनेता माम्मूटी, यांचा समावेश आहे. 113 जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातल्या 11 जणांचा समावेश आहे. वैद्यकीय क्षेत्रात आर्मिदा फर्नांडिस, कला प्रांतात पालघर जिल्ह्यातले तारपा वादक भिकल्या धिंडा, अभिनेता माधवन रंगनाथन, लोककला क्षेत्रात रघुवीर खेडकर, दिवंगत अभिनेता सतीश शहा, उद्योग क्षेत्रात अशोक खाडे, सत्यनारायण नुवाल, तर सामाजिक कार्यासाठी जर्नादन बोठे, विज्ञान अभियांत्रिकीमध्ये जुझेर वासी, क्रिकेटपटू रोहित शर्मा आणि कृषी क्षेत्रात श्रीरंग लाड यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे.

**मतदार दिवस-राष्ट्रपती**

मतदानाचं कर्तव्य हे देशाच्या लोकशाही निवडणूक प्रक्रियेवरील नागरिकांच्या विश्वासाचं प्रतिबिंब असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. मतदार दिवसानिमित्त दिल्लीत आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते नवमतदारांना ओळखपत्रं देण्यात आली. तसंच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, निवडणूक व्यवस्थापन, मतदार जागृती, आदर्श आचार संहितेची अंमलबजावणी, सर्वोत्कृष्ट निवडणूक पद्धती यासह विविध श्रेणींमध्ये विशेष पुरस्कार तसंच माध्यमांसाठीचे पुरस्कार प्रदान केले. मतदार जागृतीसाठी उत्कृष्ट मोहीम

राबवल्याबद्दल आकाशवाणी वृत्त विभागाला इलेक्ट्रॉनिक रेडिओ श्रेणीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**बिंद्रा-निधन**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयचे माजी अध्यक्ष इंद्रजित सिंग बिंद्रा यांचं काल निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. भारतात क्रिकेट मार्केटिंगच्या नवीन युगाची सुरुवात करणाऱ्यांमध्ये बिंद्रा यांचा समावेश आहे. 1993 ते 1996 पर्यंत बीसीसीआयचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिलं. ते 1978 ते 2014 पर्यंत तीन दशकांहून अधिक काळ पंजाब क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष देखील होते. त्यांच्या योगदानाची दखल घेत 2015 मध्ये मोहालीतील पीसीए स्टेडियमचे नाव आय.एस. बिंद्रा स्टेडियम असे ठेवण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी भारतीय क्रिकेट प्रशासनातील एक खंबीर व्यक्ती म्हणून बिंद्रा यांचा उल्लेख केला.

**क्रिकेट**

गुवाहाटीतील बरसापारा इथल्या एसीए स्टेडियमवर काल झालेल्या वीस षटकांच्या तिसऱ्या क्रिकेट सामन्यात भारतानं न्यूझीलंडचा 8 गडी राखून सहज पराभव करत मालिकेत 3-0 अशी विजयी आघाडी घेतली. वीस षटकांच्या सामन्यांच्या मालिकेतील भारताचा हा सलग 9 वा मालिका विजय आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतल्यानंतर न्यूझीलंडनं निर्धारित 20 षटकांत नऊ गडी गमावून 153 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, यजमान संघानं केवळ 10 षटकांतच 2 गडी गमावून 155 धावा केल्या. अभिषेक शर्मानं 20 चेंडूत नाबाद 68 तर कर्णधार सूर्यकुमार यादवनं 26 चेंडूत 57 धावा केल्या. भारताकडून जसप्रीत बुमराहनं 3 गडी बाद केले. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं. मालिकेतील 4 था सामना बुधवारी विशाखापट्टणम इथं होणार आहे.

**SAFF-फुटसल**

SAFF महिला फुटसल स्पर्धेमध्ये बँकॉकमध्ये काल श्रीलंकेवर 5-2 असा विजय मिळवून भारतानं उपविजेतेपद पटकावलं. सोनाली मोंडलनं हॅटट्रिक केली, तर मिथिला रमाणी आणि पूजा गुप्तानं प्रत्येकी एक गोल केला. मध्यंतरानंतर श्रीलंकेनं खेळामध्ये सुधारणा करत 2 गोल केले. शानू पास्करननं 22 व्या तर गौरी सुरेंथिरननं 28 व्या मिनिटाला गोल केला. परंतु सामन्यावर भारताचं वर्चस्व कायम राहिलं. या विजयानं सहा सामन्यांत 12 गुणांसह भारतानं विजेत्या बांगलादेशनंतर द्वितीय स्थान निश्चित केलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.